दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २८० वा | शनिवार दि. ५ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## राहुल गांधींना दिलासा:१३३ दिवसांनी शिक्षेवर स्थगिती



**दिल्ली ।** राहुल गांधी यांची खासदारकी गमावल्यानंतर १३३ दिवसांनी सुप्रीम कोर्टाने या निर्णयाला स्थगिती दिली, या निकालानेच त्यांना खासदारकी गमवावी लागली. मोदी आडनावाशी संबंधित बदनामी प्रकरणात राहुल यांना कनिष्ठ न्यायालयाने २ वर्षांची शिक्षा सुनावली होती. 'राहुल गांधींच्या याचिकेवरील सुनावणी पूर्ण होत नाही तोपर्यंत शिक्षेला स्थगिती दिली जाईल,' असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. सुनावणीची नवीन तारीख अद्याप सांगण्यात आलेली नाही.

### न्यूज कॉलम

## तलवारी बाळगणार्‍या तरूणावर गुन्हा

**साक्री ।** तालुक्यातील लोणखेडी येथे वास्तव्यास असलेल्या तरूणाने बेकायदेशिररित्या तीन धारदार तलवारी बाळगल्याने त्याचेवर निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. ऋषीकेश ऊर्फ विकास गणपतसिंग गिरासे रा.लोणखेडी, ता.साक्री हा त्याच्या ताब्यात तलवारी बाळगुन असल्याची गुप्त माहिती धुळे एलसीबीचे निरिक्षक हेमंत पाटील यांना मिळाली. त्यानुसार करण्यात आलेल्या कारवाईत लोणखेडी येथे तरूणाच्या घरी छापा टाकला असता आठ हजार रूपये किंमतीच्या तीन धारदार तलवारी मिळून आल्यात.

## अन्न व औषध प्रशासन विभागाचा छापा

**नाशिक ।** अन्न व औषध प्रशासनाने प्रतिबंधित अन्न पदार्थ विक्री बाबत कठोर धोरण स्वीकारले असून छापा सत्र सुरूच आहे. त्याचाच एक भाग म्हणून मे.प्रसाद प्रोव्हिजन, सुभाष पेठ, कळवण,नाशिक येथे छापा टाकला. त्याठिकाणी खुल्या स्वरूपात एक टन क्षमेतच्या टाकीतून नळाद्वारे खुल्या खाद्यतेलाची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले.५७ हजार ५४० रुपये किंमतीचा ५४८ किलो खाद्यतेलाचा साठा जप्त करून विक्रेत्याच्या ताब्यात ठेवण्यात आला आहे. विनापरवाना व्यवसाय करीत असल्याने व्यवसाय बंदबाबत विक्रेत्यास नोटीस दिली आहे.सदरची कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी योगेश देशमुख यांनी केली आहे.

# चळवळीचा आवाज, शब्दसुरांचा बादशाह हरपला

## प्रा. सुरेश घायवटसर यांचे निधन

**धुळे । सचिन बागुल**

महाराष्ट्रातील दलित, पुरोगामी, आंबेडकरी चळवळीत आपल्या शब्दसुरांनी प्राण फुंकणारे कवी, लेखक, संगीतकार, अभिनेते! प्रोफेशनल ऑडिओ रेकॉर्डिंग क्षेत्रातील दिग्गज व्यक्तीमत्व प्रा, सुरेश घायवटसर यांचे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे ४ जुलै रोजी मध्यरात्री २ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. पन्नाशीत घायवटसरांनी जगाचा निरोप घेणे हे कसे मान्य करायचे हा प्रश्न मनात निर्माण करणारी सरांची एक्झिट खरोखर काळजाला चटका लावणारी आहे. हे चळवळीचे मोठे व न भरुन निघणारे नुकसान आहे. घायवटसरांशी परिचित असलेल्या सर्वांनाच या बातमीचा धक्का बसला आहे.

धुळे शहर व जिल्ह्यासह संपूर्ण खान्देशाशी सरांचे खूप जिव्हाळ्याचे, आपुलकीचे नाते होते. मोठमोठ्या कलाकृती सहज निर्माण करणार्‍या घायवटसरांनी कधीच याबाबत मोठेपणा बाळगला नाही. अमुकतमुक हे मी तयार केलंय असं ते कधीच कुणाला सांगत नसत. धुळ्यातील एका खानदानी राजकीय नेत्याने सरांना सरांचेच एक गाणे ऐकवून असे गाणे बनवून देवू शकाल का? असे विचारले. पण सरांनी हे माझंच प्रॉडक्ट आहे असे न सांगता विनम्रपणे फक्त प्रयत्न करतो असे म्हटले. खरे माहित झाल्यावर तो नेता सरांच्या प्रेमातच पडला. असे भलेभले, रथीमहारथी सरांचे चाहते झाले. एम.ए. इंग्रजी झालेल्या अत्यंत हुशार अशा घायवटसरांना प्राध्यापकाची नोकरी करुन सुखसंपन्न आयुष्य जगता आले असते. तशा संधीही चालून आल्या. पण सरांनी आपल्यातील लेखन, गायन आणि संगीत या त्रिवेणी कलेचीच सेवा करीत आयुष्य घालविले. एकदा काम हाती घेतले की ते पूर्ण केल्याशिवाय उठायचे नाही. दिवसरात्र सलग तासोनतास काममग्न राहून मनाला समाधान मिळत नाही तोपर्यंत त्या कामावर मेहनत घेणे हा त्यांचा कार्यहट्टच होता. गीत लिहीले की त्याला चाल लावायची व संगीतबध्द करायचे यात सरांचा हातखंडा होता.



वही, पेन, लॅपटॉप, म्युझिक की बोर्ड, साऊंड मिक्सर व दोन माईक एवढ्याशा सामग्रीवर मोठमोठ्या संगीतकारांनाही भुलवतील अशी गाणी सरांनी रचली, गायली व संगीतबध्द केली. यात आंबेडकरी वीचारधारा व दलित, पुरोगामी चळवळीवर आधारित शेकडो गाणी सरांनी निर्मिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात सरांनी लिहीलेल्या गाण्यांनी आंदोलनाला प्रखर धार चढवली होती. डॉ, बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुध्द आणि त्यांचा धम्म' या धम्मग्रंथाचे संपूर्ण ऑडिओ बुक बनविण्याचा मोठा प्रोजेक्ट ते करीत होते.

लोककवी वामनदादा कर्डकांचा त्यांना स्नेहआशिर्वाद होता. याशिवाय सामाजिक प्रबोधनपर गाणी, चित्रपटगीते, प्रेमगीते, भावगीते, सजीव देखाव्यांसाठीची गीते, विरहगीते, भक्तीगीते, अहिराणी गीते अशा सर्वच प्रांतात सरांनी अधिराज्य गाजविले. निवडणूक प्रचाराच्या ऑडिओ रेकॉर्डिंग सॉग्सबाबत सरांना तोडच नव्हती. चळवळीचा व एकंदरीत समाजव्यवस्थेचा सखोल अभ्यास, सामाजिक प्रश्नांची उत्तम जाण, भाषेवर प्रभुत्व, डोक्यात शब्दांचे भंडार, स्पष्ट शब्दोच्चार, सुमधुर व मंजुळ पण तेवढाच कणखर आवाज, संगीताचे उत्तम ज्ञान या सर्व घायवटसरांच्या जमेच्या बाजू होत्या. उत्तम क्वालिटी हेच त्यांचे वैशिष्ट्य होते. मोठमोठे मंत्री, आमदार, खासदार, नेतेमंडळी यांची निवडणूकीच्या कामांसाठी सरांनाच अगोदर बुक करुन ठेवायचे. प्रॉडक्ट फेरफार, कॉपी पेस्टिंग याला त्यांच्याकडे जागाच नव्हती. सतत नवनिर्मितीचा ध्यास होता. नंदुरबार नगरपालिकेच्या एका निवडणूकीत चंद्रकांत रघुवंशी यांच्या काँग्रेस पॅनलसाठी सरांनी तयार केलेलं 'नंदनगरीसाठी रे चंदुभैय्या पाहीजे' हे गीत एवढे गाजले होते की, रघुवंशींच्या ३६ पैकी ३५ जागा निवडून आल्या होत्या. स्वत: चंदुभैय्यांनी विजयी सभेत त्या गाण्याला क्रेडिट दिले होते. अशा कितीतरी पावत्या सरांच्या कामाची प्रचिती देणार्‍या ठरल्या. मी महाराष्ट्र चॅनलच्या विविध प्रोजेक्ट्समध्ये सरांनी गाणी तयार केली. दैनिक शोधयात्रामध्ये त्यांचे 'टोलेजंगी' नावाचे काव्यसदर खूप प्रसिध्द झाले होते. बॉलीवूडमधील मोठमोठ्या गायकांसोबत ते गायले होते. एवढे सारे करुनही सरांना कशाचाच गर्व नव्हता. सरांच्या कलाकृती याच आता आठवणी आहेत. त्या जपूया. स्मृतीशेष सुरेश घायवटसराना शेवटचा मानाचा जयभीम. भावपूर्ण आदरांजली। साधु! साधु!! साधु!!!

# धुळ्यात जनआक्रोश मोर्चा

## आरोपींना फाशी देण्याची मागणी

**धुळे । प्रतिनिधी**

मणिपूर राज्यासह देशभरातील दलित, आदिवासी समाजावर अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. मात्र, कठोर कायदा तयार करण्यासाठी सरकारकडून कोणतीही पावले उचलली जात नसल्याने आदिवासी समाजात संतापाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर धुळ्यात सलग दुसर्‍या दिवशी भिल आदिवासी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारोंच्या संख्येने भिल आदिवासी समाजबांधव सहभागी झाले होते. मोर्चा दरम्यान सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत संताप व्यक्त करण्यात आला.



### या आहेत मागण्या

**मणिपूर राज्यात कुकी आदिवासी समाजातील महिलांची नग्न धिंड काढून बलात्कार तसेच खून करणार्‍या आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, मणिपूरचे अकार्यक्षम मुख्यमंत्री विरेंद्र सिंग यांचे सरकार बरखास्त करुन राष्ट्रपती राजवट लागू करावी, तसेच राज्यातील संपूर्ण सुरक्षा भारतीय सेनेकडे सोपवून मणिपूर राज्यातील दंगलीवर नियंत्रण मिळवावे, देशात समान नागरीकायदा (युसीसी) लागू करु नये, देशातील अल्पसंख्यांक दलित, आदिवासी महिलांवर होणारे अत्याचार थांबवावेत, धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा महामार्गावर धमाणे येथे दि.९ जुलै २०२३ रोजी आदिवासी तरुण रमेश सोनवणे याचा खून झाला होता, या खुनाची सीबीआय चौकशी करावी, मध्यप्रदेश येथे आदिवासी युवकावर मुत्रविसर्जन करणारा बीजेपी कार्यकर्ता प्रवेश शुक्ला याच्यावर कठोर कारवाई करावी, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.**

शहरातील फाशीपुल येथून दुपारी १ वाजेच्या सुमारास जन आक्रोश मोर्चाला सुरवात झाली. येथून हा मोर्चा महात्मा फुले स्मारक, बारापत्थर, राजवाडे संशोधन मंडळ मार्गे, गुरुशिष्यस्मारकाकडून क्युमाईन क्लब येथे धडकला. या मोर्चात युवक, महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चेकर्‍याच्या हातातील घोषणांचे फलकही सार्‍यांचे लक्ष वेधून घेत होते. तसेच हातात वीर एकलव्याच्या लाल ध्वजासह निळे व पिवळे झेंडे घेवून हा मोर्चा मार्गस्थ होत होता. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहर पोलीस ठाणे व आझादनगर पोलीस ठाण्यातील कर्मचारी लक्ष ठेवून होते. या विराट मोर्चामुळे वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. हा मोर्चा क्युमाईन क्लबजवळ धडकल्यानंतर मोर्चाच्या धुरीनांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यानंतर शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाप्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

# नाशिक जिल्हा परिषद करणार विविध १०३८ पदांसाठी मेगा भरती

**नाशिक । प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षात मेगा भरतीची घोषणा करण्यात आली. त्यानुषंगाने नाशिक जिल्हा परिषदेतील रिक्त पदांची भरती प्रक्रिया ही आजपासून राबवण्यात येणार आहे. यामध्ये २० संवर्गातील तब्बल १०३८ पदांची भरती प्रक्रिया पार पडणार असून यासंदर्भातील जाहिरात ही नाशिक जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सरळसेवेने भरावयाच्या पदाकरीता https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/ या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी https://zpnashik.maharashtra.gov.in या नाशिक जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली सविस्तर जाहिरात वाचून त्याप्रमाणे विहित मुदतीत अर्ज सादर करावेत. सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात https://zpnashik.maharashtra.gov.in या नाशिक जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचून ऑनलाईन पद्धतीनेच https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/ या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत.

### ही पदे भरली जाणार

**(कंत्राटी) ग्रामसेवक - ५०, आरोग्य पर्यवेक्षक - ३, आरोग्य परिचारिका आरोग्य सेवक (महिला) - ५९७, आरोग्य सेवक (पुरुष) ४०% - ८५, आरोग्य सेवक (पुरुष) ५०%- १२६, औषध निर्माण अधिकारी - २०, प्रयोगशाळा तंत्रज्ञ - १४, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) - २, विस्तार अधिकारी(शिक्षण) (वर्ग ३ श्रेणी २) - ७, वरिष्ठ सहाय्यक - ३, पशुधन पर्यवेक्षक - २८, कनिष्ठ आरेखक - २, कनिष्ठ लेखा अधिकारी - १, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) - ५, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) - २२, मुख्य सेवीका / पर्यवेक्षिका - ४, कनिष्ठ यांत्रिकी - १, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / ग्रा.पा पु.) - ३४, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (स्थापत्य ) इवद - ३३, लघुलेखक (उच्च श्रेणी) - १**

# ऊसतोडणी कामगार पुरविण्याचा बहाणा ; १२ लाखात फसवणूक

**धुळे । प्रतिनिधी**

ऊस तोडणीसाठी कामगार पुरविण्याच्या बहाण्याने सांगली जिल्ह्यातील दोघांची बारा लाखात फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी गरताड व सोनशेलूतील दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावीर आदगौडा (वय ५४ रा. ऐतवडे ता. वाळवा जि. सांगली) यांनी शिरपूर शहर पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांना वारणा सहकारी साखर कारखान्यासाठी ऊसतोड व वाहतूकीसाठी २४ मजुर पुरवितो, असे सांगून विश्वनाथ नथ्थु भिल (रा. गरताड ता. शिरपूर) याने नोटरी करून त्यांच्याकडून एकुण आठ लाख ७५ हजार २६ रूपये घेतले. मात्र ऊसतोड व वाहतूकीसाठी मजुर न पुरविता फसवणूक केली. हा प्रकार दि. ६ जुलै २०२१ ते ४ जुलै २०२२ दरम्यान घडला. याप्रकरणी विश्वनाथ भिल याच्याविरोधात भादंवि ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पीएसआय सोनवणे हे करीत आहेत. तर दुसरी तक्रार युवराज काशिनाथ पाटील (वय ४० रा. इटकरे ता.वाळवा जि.सांगली) या शेतकर्‍याने शिंदखेडा पोलिसात दिली आहे. त्यानुसार, अनिल झिंगा ठाकरे (रा. सोनशेलू ता.शिंदखेडा) याने सन २०१८ ते २०१९ चे गळीत हंगामासाठी ऊसतोड व भरणीसाठी ऊसतोड कामगार पुरवितो,असे सांगून विश्वास संपादन केला. त्यानंतर त्यासाठी रोख व बँक खात्यावर एकुण चार लाख १० हजार रूपये घेतले. मात्र त्यानंतर ठरविल्याप्रमाणे कामगार पाठविले नाही आणि पैसे देखील परत न करता फसवणूक केली. पुढील तपास पोहेकाँ चव्हाण हे करीत आहेत.

# संदर्भ सेवा रुग्णालयातील 'कॅथलॅब' अखेर सुरू; पालकमंत्र्यांच्या आदेशाने त्वरित कार्यवाही

**नाशिक । प्रतिनिधी**

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयांमधील हृदयरोग विभागातील अतिमहत्त्वाची कॅथलॅब यंत्रणा मुदत बाह्य (एक्सपायर) झाल्याने बंद पडल्याची बातमी काही दैनिकांमध्ये प्रसिद्ध झाली. ही गंभीर बाब लक्षात घेवून नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी आरोयसेवा उपसंचालक यांच्याशी बोलून तातडीने दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्याच्या सूचना दिल्यानंतर १० लाख रुपये निधी दुरुस्तीसाठी मंजूर करण्यात आला. त्यानंतर काल रोजी ही यंत्रणा कार्यान्वित झाली आहे.

यामुळे मागील दोन महिन्यापासून रुग्णालयात अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी बंद झाल्याने संदर्भ रुग्णालयातील रुग्ण खासगी रुग्णालयात जात होते. याचा आर्थिक भुर्दंड रुग्णांना सोसावा लागत होता. प्रशासनाला पालकमंत्री दादा भुसे यांनी तातडीने बंद पडलेली कॅथलॅब दुरुस्त करून तातडीने सुरू करण्याचे आदेश दिले. या आदेशाची अमलबजावणी करत १० लाख रुपये निधी मंजूर केला त्यानंतर काल ही मशिनरी दुरुस्त करून रुग्णांसाठी उपलब्ध झाली आहे. पालकमंत्री महोदय स्वतः या मशिनरीचा पाठपुरावा करत आहेत. यामुळे लवकरच नवीन मशिनला मंजुरी मिळणार आहे. नाशिकसह उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा ते विदर्भातून या रुग्णांवर उपचार होत असलेल्या संदर्भ सेवा रुग्णालयाच्या हृदयरोग विभागातील अतिमहत्त्वाची कॅथलॅब यंत्रणा कार्यान्वित झाली असल्याने रुग्णांनी तसेच नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# कु. निलीमा चव्हाणच्या मारेकर्‍यांना अटक करा या मागणीसाठी नाभिक समाजाची निदर्शने

**धुळे । प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील ओमळी गावातील नाभिक समाजाची कु, निलीमा सुधाकर चव्हाण ही २४ वर्षीय तरुणी २९ जुलैपासून बेपत्ता होती. १ ऑगस्ट रोजी तिचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आला.

यावरुन निलीमाचा घातपात झाल्याचा नातेवाईकांना संशय आहे. त्यामुळे निलीमाच्या मारेकर्‍यांना तात्काळ शोधून अटक करुन निलीमा व तिच्या कुटुंबाला न्याय मिळवून द्या अशी मागणी करीत धुळे शहर नाभिक समाजातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करुंन प्रशासनाला निवेदन देण्यात आले. तसेच मणीपूरसह देशातील व महाराष्ट्रातील विविध ठिकाणी घडलेल्या महिला व मुलींवरील अत्याचाराच्या घटनांचा तीव्र निषेध करण्यात आला. या आंदोलनात उमेश महाले, त्रिवेणी सोनवणे, दिनेश महाले, वैशाली सैंदाणे, भगवान चित्ते, मनिषा चित्ते, विलास सैंदाणे, छाया महाले, युवराज वारुडे, संध्या सैंदाणे, भावना सोनवणे, ज्योती महाले, जयश्री पगारे, वंदना पगारे, कल्याणी ठाकरे, राजेश महाले, राहुल सुर्यवंशी, भीमराव वारुडे, गणेश ठाकरे, मनोज ठाकरे, भरत शिरसाठ, भोला सैंदाणे, ज्ञानेश्वर वारुडे यांच्यासह नाभिक समाजाच्या विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.



# धुळे जिल्हा परिषदेत होणार ३५२ पदांसाठी भरती

## मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांची माहिती



**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्हा परिषदेत बंपर भरती निघाली आहे. वर्ग ३ च्या ३५२ पदांसाठी भरती प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविली जाणार असून दि.२५ ऑगस्टपर्यंत पात्र उमेदवार ऑनलाईन प्रक्रियेने अर्ज दाखल करु शकतात. या पदांसाठी अर्ज करणार्‍या उमेदवारांच्या काही शंका असतील,अडचणी प्रश्न असतील तर त्यांच्या मदतीसाठी जिल्हा परिषदेने हेल्पलाईन नंबरही दिला. असल्याची माहिती धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

जाहिरातींमधील पदे ही धुळे जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमधील आहेत. आरोग्य पर्यवेक्षक १ पद, आरोग्य सेवक पुरुष-५९ पदे, आरोग्य परिचारिका २०६, औषध निर्माण अधिकारी ७,कंत्राटी ग्रामसेवक ५, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ६, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)१, मुख्यसेविका/पर्यवेक्षीका ८, पशुधन पर्यवेक्षक ११, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ३,वरिष्ठ सहाय्यक (लेखा), विस्तार अधिकारी (कृषी) १, स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (बांधकाम/लघुपाट बंधारे )४१ अशा ३५२ पदांसाठी ही जाहीरात असून शासनाने नेमून दिलेल्या आयबीपीएस कंपनीमार्फत परिक्षा प्रक्रिया राबविली जाणार आहे.





त्यानंतरची पुढील प्रक्रिया जिल्हा परिषदेतमार्फत शासनाच्या गाईड लाईननुसार राबविली जाईल.

इच्छूक उमेदवारांनी २५/०८/२०२३ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑलनाईन अर्ज करावा, या जाहिरातीच्या अनुषंगाने रिक्त पदांचा तपशिल, पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेणी, वयोमर्यादा,परिक्षा शुल्क, ऑनलाईनअर्ज करण्याची पध्दत , अर्ज करण्याची मुदत व इतर आवश्यक अटी व शर्ती इत्यादी बाबी मा.जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथील संकेतस्थळ, धुळे जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर ५ ते २५ ऑगस्ट या कालावधीत कार्यालयीन वेळेत संपर्क साधू शकतात. असेही सीईओ गुप्ता म्हणाले. उमेदवारांनी वेगवेगळ्या जिल्ह्यात अर्ज करु नये कारण परिक्षेचा दिवस एकच असण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होवू शकते. परिक्षा शुल्क खुला गटासाठी १ हजार रुपये तर इतरांसाठी ९०० रुपये इतकी आहे. बहु पर्यायी प्रश्नांच्या स्वरुपात परिक्षा असेल,२०० मारकांसाठी १०० प्रश्न असतील असेही ते म्हणाले.

# बल्हाने येथील शेतातून रोटावेटर, ट्रिलरची चोरी

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

पिंपळनेर येथुन जवळच असलेल्या बल्हाने (ता. साक्री) शिवारातील शेतातून चोरट्यांनी रोटावेटर व ट्रेलर पिकअप चोरून नेले. याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

पिंपळनेर येथुन जवळच असलेल्या खासगी कांदा मार्केटजवळ बल्हाने येथील शेतकरी चेतन अरविंद बिरारीस यांच्या मालकीचे शेत आहे. तेथून चोरट्यांनी रोटावेटर व ट्रेलर पिकअप वाहनात टाकून चोरून नेले. चेतन बिरारीस शेतात गेले असता चोरीचा प्रकार उघडकीस आला. शोधाशोध घेऊनही साहित्य न मिळाल्याने चोरी झाल्याची ओळखी झाले. याप्रकरणी चेतन बिरारीस यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. मागील तीन चार महिन्यापासून पिंपळनेर परिसरातून शेतातील अवजारांच्या चोरीचे प्रमाण वाढले आहे. काही चोरीच्या घटनांचा छडा सुद्धा लागला आहे. तरी सुद्धा चोरट्यांना जरब बसत नाही व शेतकर्‍यांचे लाखो रुपयांचे अवजारे चोरून ते इतरत्र कवडीमोल भावाने त्याची विक्री करतात. परिसरातील शेतकर्‍यांनी दक्षता घ्यावी, तसेच चोरी, चोरट्यांचा संशय आल्यास कुठे विक्री होत असतील तर जवळच्या पोलीस ठाण्यात सूचना द्यावी, असे आवाहनही पिंपळनेर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण पारधी यांनी केले.

## सर्वोच्च सवाल..!

मणिपूरमध्ये गेले तीन महिने जे घडत आहे, त्याला जबाबदार कोण? हा प्रश्न अनुत्तरित आहे. समस्या हाताळण्यात तेथील राज्य सरकारला अपयश आले हेही कोणी मान्य करत नाही. मणिपूरमधील घटनात्मक यंत्रणा कोलमडली आहे, कायदा आणि सुव्यवस्था मोडकळीस आली आहे, हे मत विरोधी पक्षाच्या कोण्या नेत्याने व्यक्त केलेले नाही, तर सर्वोच्च न्यायालयाचे ते मत आहे. राज्यात मे महिन्याच्या सुरुवातीपासून सुरु असलेल्या हिंसाचाराच्या संदर्भात राज्यात प्राथमिक माहिती अहवाल किंवा गुन्हे दाखल करण्यात आले. त्यांच्या स्थितीचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला. सहा हजार ५२३ प्राथमिक माहिती अहवाल नोंदले गेले याचाच अर्थ राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती पूर्ण ढासळली आहे असा होतो, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. दिनांक ४ मे ते २७ जुलैपर्यंत पोलिसांचे स्थितीवर नियंत्रण नव्हते हे स्पष्ट दिसत आहे, अशी कडक टीका करत गुन्हा नोंदवून घेण्यासही स्थिती अनुकूल नव्हती का? असा प्रश्न राज्य सरकार व पोलिसांना केला. गुन्हे नोंदवून घेण्यास, त्याची चौकशी किंवा तपास करण्यात पोलिसांनी केलेल्या दिरंगाईवरही सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्याच्या संदर्भात गुन्हा दाखल करून घेण्यास चौदा दिवस का लागले? चार मे रोजी ही घटना घडल्यावर, हल्लेखोर नेमके माहीत नसताना 'झिरोएफआयआर' दाखल करण्यात कोणता अडथळा होता? अशीही विचारणा न्यायालयाने केली. गेले तीन महिने मणिपूरमधील हिंसाचार व तेथील समस्या देशभर चर्चेत आहे. सर्वोच्च न्यायालयाने खडसावल्यानंतर या काळात दाखल झालेल्या गुन्ह्यांची माहिती व त्याच्या स्थितीचा अहवाल सादर करण्यात आला. हजारोंच्या संख्येने गुन्हे दाखल होतात याचाच अर्थ राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती कोलमडली आहे हे सर्वोच्च न्यायालयाचे मत बिनतोड आहे. हिंसाचार थांबवण्यास, दंगलग्रस्तांना संरक्षण पुरवण्यात सरकारला अपयश आले. घटनात्मक यंत्रणा म्हणजेच सरकार तेथे अस्तित्वात नाही असे तेथील घटनांवरून दिसून येते हे देशातील माध्यमांनी व विरोधी पक्षांनी निदर्शनास आणून दिले आहे. न्यायालयाने त्यावरच बोट ठेवले आहे. हल्लेखोर जमावाच्या ताब्यात पोलिसांनी आपल्याला दिले असे चित्रफितीत दिसणार्या महिलांनी नुकतेच निवेदन केले आहे. त्याचा संदर्भ घेत, त्या पोलिसांची चौकशी केली का? पोलिसांपैकी कोणाला अटक केली का? पोलिस महासंचालकांनी माहिती तरी करून घेतली का? अशी विचारणा न्यायालयाने राज्य सरकारकडे केली. येत्या सोमवारी पोलिस महासंचालकांना उपस्थित राहण्यास सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. तेव्हा तरी या प्रश्नांची उत्तरे मिळावीत अशी अपेक्षा आहे. केंद्र व राज्य सरकारने मणिपूरचा राजकीयदृष्ट्या त्याग केला आहे काय असे वाटावे अशी तीन महिने स्थिती आहे. देशातच नव्हे, तर जगात मणिपूरमधील हिंसाचार व महिलांवर झालेले अत्याचार गाजले. त्यावर टीका झाली. तरीही मुख्यमंत्री बिरेन सिंग यांना पदावरून दूर करण्याची कारवाई केंद्राने केली नाही. विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यात महिलांवर झालेल्या हल्ल्यांचा मुद्दा उपस्थित करून सत्ताधारी पक्षाने विरोधकांना प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. त्याचाही परामर्श सर्वोच्च न्यायालयाने घेतला. इतरत्र होणार्या घटनांचा हवाला देत मणिपूरमध्ये जे घडले त्यापासून सुटका करून घेता येणार नाही, अशा आशयाच्या शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र व राज्य सरकार तसेच अप्रत्यक्षरीत्या सत्ताधारी भाजपला सुनावले आहे. संसदेत मणिपूरवर पूर्ण चर्चा व्हावी, की अल्पकालीन चर्चा व्हावी या मुद्द्यावर घोडे अडले आहे. आता १६७व्या नियमानुसार म्हणजेच अल्प मुदतीची चर्चा होण्यास विरोधी पक्ष अनुकूल झाले आहेत. मात्र, चर्चेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवेदन करावे ही आग्रही मागणी त्यांनी मांडली आहे. पेच येथे आहे. महिलांवरील अत्याचाराची चित्रफीत प्रसिद्ध झाल्यावर मोदी यांनी केलेले विधान अत्यंत मोघम होते. एरवी विरोधी पक्षांवर जशी ते आगपाखड करतात तसे ते बोलले नाहीत. ते का? हा प्रश्नही अनुत्तरित आहे. न्यायालयाने केलेल्या सवालांसह या प्रश्नाचे उत्तर तरी मिळेल का? हाच मोठा प्रश्न आहे.

# रानकवी हरपल्याने निसर्गही निःशब्द

सध्या पावसाने सर्वदूर हजेरी लावली असून त्याच्या येण्याने निसर्ग बहरला असून अवघी धरती हिरवा शालू परिधान करून नटली आहे. अशा रम्य वातावरणात महाराष्ट्राचे निसर्गकवी ना. धों. महानोर यांनी जगाचा निरोप घेतला आहे. त्यांच्या निधनाने साहित्य विश्वावर शोककळा पसरली आहे. ज्याला निसर्ग समजला त्याला आयुष्याचा अर्थ उमगला असे म्हटले जाते आणि ही बाब तंतोतंत खरी ठरविली ती कवी ना. धों. महानोर यांनी. महानोर म्हणजे महाराष्ट्राला पडलेले निसर्गस्वप्नच जणू. महानोर हे तरल निसर्ग काव्यासाठी ओळखले जायचे. आपल्या गीतांतून मातीचा गंध पेरणारे महानोर यांच्या शब्दांतूनच निसर्ग बोलतो, डोलतो आणि नाचतोही. त्यांच्या निसर्गकवितांनी आजवर महाराष्ट्राला रानभूल घातली आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील पळसखेड खेड्यात गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या ना. धों. यांचे बालपण कष्टात गेले, पण कष्ट झेलताना त्यांचे संवेदनशील मन राना-वनांत रमले. तिथेच त्यांच्या सर्जनशीलतेला धुमारे फुटले. त्यांच्या कवितांनी रानातल्या कविता, पावसाळी कवितांनी, 'जैत रे जैत'सारख्या अनेक चित्रपट गीतांनी मराठी माणसांच्या मनावर गारूड केले. त्यांनी मराठी साहित्याला मातीचा गंध दिला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे जीवन, ग्रामीण संस्कृतीचे वैभव त्यांनी मराठी साहित्यात आणले. 'रानातल्या कवितां'नी वाचकांना निसर्गाची सहल घडवली. मराठवाडी बोलीतल्या 'पानझड', 'तिची कहाणी', 'पळसखेडची गाणी'सारख्या लोकगीतांनी मराठी साहित्य समृद्ध केले. कवयित्री बहिणाबाई, बालकवींचा वारसा पुढे नेत त्यांनी साहित्यक्षेत्रात अढळ स्थान निर्माण केले.

त्यांच्या गीतांमधून-कवितांमधून निसर्गाचे खऱ्या अर्थाने दर्शन घडायचे. त्यांनी जशी निसर्गाची वर्णन करणारी गीते लिहिली, तशा ठसकेबाज लावण्याही लिहिल्या. श्रावणातल्या उन्हाचा कोवळेपणा आणि स्त्रीचा नाजूकपणा एकत्रितपणे दर्शवणारी कवी ना. धों. महानोर यांची 'श्रावणाचं ऊन्ह मला झेपेना' ही आशा भोसले यांनी 'एक होता विदूषक' या चित्रपटासाठी गायलेली लावणी खूप लोकप्रिय झाली. आम्ही ठाकरं ठाकरं, चिंब पावसानं रान झालं आबादानी, नभ उतरू आलं, जांभूळ पिकल्या झाडाखाली, जाई



जुईचा गंध, किती जीवाला राखायचं, बाळगू कशाला व्यर्थ कुणाची भीती अशी एकाहून एक सर गाणी ना. धों. महानोर यांनी लिहिली.


एक किस्सा ते नेहमी सांगत. त्यांच्या 'रानातल्या कविता' सर्वत्र गाजत असतानाच एके दिवशी मंगेशकर कुटुंबीयांकडून त्यांची निर्मिती असलेल्या 'जैत रे जैत' या चित्रपटातील गाणी लिहिण्याचा प्रस्ताव त्यांच्याकडे आला. या चित्रपटाचे दिग्दर्शन जब्बार पटेल करणार होते, तर मोहन आगाशे, स्मिता पाटील असे मोठे कलाकार त्यात काम करणार होते. सिनेमाचे संगीत हृदयनाथ मंगेशकर देणार होते आणि अर्थातच गाणी लता मंगेशकर गाणार होत्या. हृदयनाथ आणि लताबाईंनी हा चित्रपट संगीतमय करण्याचा निर्णय घेतला होता आणि त्यासाठी त्यांना तब्बल १६ गाणी हवी होती. ती जबाबदारी त्यांनी महानोरांवर टाकली होती. पण दिग्गजांची नावे पाहूनच, हे आपल्याला जमणार नाही, असे सांगून महानोरांनी त्यांना नम्रपणे नकार कळवला होता. मात्र गाणी ना.धों.नीच लिहावीत यावर हृदयनाथ आणि लताबाई ठाम होत्या. मग त्यांनी महानोरांना त्यांच्या घरी 'प्रभुकुंज'मध्ये तीन दिवस कोंडून ठेवले. तेव्हा आपल्यावरील त्या जबाबदारीच्या भानातून महानोरांनी तब्बल १६ गाणी लिहिली, जी पुढे खूप गाजली. त्यानंतर 'एक होता विदूषक', 'सर्जा' यांसह तब्बल ११ चित्रपटांसाठी त्यांनी गाणी लिहिली. महानोर यांना बोलीभाषेचा सार्थ अभिमान होता आणि त्याची अविट गोडी त्यांनी ओळखली होती. त्यामुळेच आपल्या साहित्यात बरेचवेळा ते मराठीच्या बोलीभाषांचा वापर करीत असत. त्यामुळेच अगदी सर्वसामान्यांपर्यंत बोलीभाषांचा गंध सर्वदूर पसरला व त्यांजी गोडी कळली. त्यांच्या कवितांनी बालकवी आणि बहिणाबाईंचा वारसा समृद्ध केला. ना. धों. महानोरांचे 'पानझड', 'तिची कहाणी', 'पळसखेडची गाणी' म्हणजे मराठवाडी लोकगीतांचा खजिनाच म्हटला पाहिजे. आपल्या काव्यलेखनाला त्यांनी प्रत्यक्ष कृतीची जोड दिलेली दिसली. केवळ निसर्गकविता न लिहिता शेतीतले, शेतातले काही प्रयोगही यशस्वीपणे राबविले. पळसखेडला साहित्यविषयक लेखन सुरू असताना त्यांच्यातील प्रयोगशील शेतकरीही हा जागा होता. शेती, पाणी, पर्यावरण हे त्यांचे आवडीचे विषय. पळसखेडला शेतावर ते अनेक प्रयोग करत होते. लेखन सुरूच होते. अनेक नामवंत लेखक त्यांना पळसखेडला जाऊन भेटत.त्यांची पळसखेडची शेती ही साहित्यिकांचे पर्यटन स्थळ व गप्पांचा अड्डा झाला होता.

जलसंधारण, ठिबक सिंचन, फळबागा यावर महानोरांचे विशेष प्रेम होते. खरं म्हणजे 'पाणी अडवा पाणी जिरवा' या संकल्पनेचे महानोर हे जनक. विधान परिषदेत दोन वेळा सदस्य राहिलेल्या महानोरांनी शेतीतील अनुभव जलसंधारण यावर शासनाला वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांना आलेल्या अनुभवातून शेतीसाठी पाणी, सीताफळ बागेची गोष्ट, 'या शेताने लळा लाविला'चे लेखन केले. सरकार कुठलेही असो, त्यांचे लक्ष कृषिधोरणाकडे असायचे. पंचेचाळीस वर्षांपूर्वी हजार लोकसंख्या असलेले पळसखेडे हे गाव महानोरांच्या कवितांमुळे जगाच्या नकाशावर आले. या गावाची माती आणि शेती म्हणजे त्यांचा प्राणच होता. तिचा त्यांनी कायम अभिमान बाळगला. ते कुठेही गेले तरी पळसखेड हे त्यांचे आनंदनिधान ठरले आहे. आपल्या या कर्मभूमीत त्यांनी महात्मा फुले यांच्या नावाने वाचनालय सुरू केले असून तेथील सामाजिक-सांस्कृतिक चळवळीचे ते प्रमुख केंद्र ठरले आहे. असा रानावनांत रमणारा आणि आयुष्याचा अर्थ सामान्यजनांना सहजसोप्या शब्दांत लीलया समजावून सांगणारा रानकवी हरपल्याने निसर्गही जणू निःशब्द झाला आहे.

# कलाकार आणि भावनिक शहाणपण

**मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये अतुलनीय यश संपादन करणारे कलादिग्दर्शक नितीन देसाई यांच्या निधनाने शोककळा पसरली. एक सचोटीचा कलाकार आत्महत्येसाठी का प्रवृत्त होतो याचे अवलोकन होणे ही काळाची गरज आहे. सिनेसृष्टीमधील वाढते तणाव आज अनेक कलाकारांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम करत आहेत. कलाकारांच्या आत्महत्यांच्या वाढत्या घटनांमागील कारणे आणि उपाययोजनांचा हा आढावा.**

नुकत्याच समोर आलेल्या नितीन देसाई यांच्या दुःखद निधनाच्या वृत्ताने काही समस्यांवर विचार करण्यास भाग पाडले. मराठी आणि हिंदी अशा दोन्ही चित्रपटसृष्टींमध्ये नाव कमावणाऱ्या कलाकाराला आत्महत्येसारखे पाऊल उचलावेसे वाटणे ही खिन्न करणारी बाब आहे. पडद्यावरील कलाकारांचे भावविश्व आपल्याला वरकरणी परिचित असते. पण पडद्यामागील कलाकारांच्या मानसिक हिंदोळ्यांचा आढावा घेताना अनेकविध बाबी समोर येतात. कलाकाराचे आयुष्य उत्तेजक घटनांनी ओतप्रोत भरलेले असते. कलाकार मंडळी कोणत्याही घटनेशी भावनिकरीत्या वेगाने जोडली जातात. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचे पडसाद कलाकारावर अधिक तीव्रतेने उमटतात. पडद्यावरील कलाकार असो वा पडद्यामागचा कलाकार असो, कलाकृतीचा गाभा जाणूनच काम करावे लागते. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी कौशल्यांचा कस




लागतो तसाच भावनांचाही कस लागतो. मुळातच अधिक भावनिक असल्यामुळे कलाकृतीचा गाभा गाठणे कलाकारांना सोपे जाते. कलाकारांच्या मानसिक स्वास्थ्यावर याचा कळत-नकळत परिणाम होत असतो. पण भावनिक तीव्रता अधिक असली तरी कलाकारांचे 'इमोशनल इंटेलिजन्स' कमी असते. कलाकारांच्या भावनिक आलेखाचा अभ्यास केल्यावर हे समोर येते. इमोशनल इंटेलिजन्स म्हणजे भावना ओळखून, त्यांची तीव्रता जाणून योग्य प्रकारे केलेले अवलोकन. आपल्या मनात एखादा विचार आल्यावर त्यामागचे समर्पक कारण शोधण्यासाठी 'इमोशनल कोशंट' महत्त्वाचा असतो. कलाकारांमध्ये हा इमोशनल कोशंट थोडा कमी आढळतो. भावनांचे सूज्ञपणे अवलोकन करण्याच्या ताकदीपेक्षा कलाकार भावनाप्रधानतेला जास्त आपलेसे करतात.

कलाकारांच्या भावनांची तीव्रता इतर माणसांपेक्षा अधिक असते. कलाकारांमध्ये काम करण्याची जिगर प्रचंड असते. कलाक्षेत्रात टिकून राहण्यासाठी ही जिगर गरजेचीही असते. पण त्यामुळे येणारा तणावही तितक्याच ताकदीचा असतो. इतर क्षेत्रांमध्येही कामाच्या तणावाचे प्रमाण दखलपात्र असते; पण ऑफिसमधून बाहेर पडल्यावर, लॅपटॉप बंद केल्यावर या क्षेत्रातील लोकांना कामापासून विलग होता येते. या क्षेत्रामधील कामाचे स्वरूप भावनारहित असल्यामुळे तणावाचे स्वरूपही वेगळे असल्याचे जाणवते. याउलट, कलाकार एखाद्या कलाकृतीसाठी अभ्यास करताना भावनिकरीत्या झोकून देतात. कलाकृतीशी एकरूप व्हायचा प्रयत्न करतात. त्याचा एक परिणाम म्हणून आपल्यासमोर अत्यंत प्रभावी कलाकृती उभ्या राहतात. पण दुसऱ्या बाजूला सबकॉन्शियसली कलाकारांवर प्रत्येक कलाकृतीचा चांगला-वाईट परिणाम होत असतो. कारण भावना तीव्र होत जातात तशा अधिक अस्थिर होत जातात. त्यामुळे भावनाप्रधान कलाकारांनी भावनिक स्थैर्यासाठी प्रयत्नशील राहायला हवे.

कलाकारांच्या मानसिक अस्थैर्यामागे आणखी एक गोष्ट महत्त्वाची असल्याचे जाणवते. कलाकार कलाकृतीच्या बाबतीत, पात्राच्या बाबतीत, इतर कलाकारांप्रती अतिशय संवेदनशील असतात. पण हीच संवेदनशीलता स्वतःसाठी दाखवत नाहीत. अनेक कलाकार 'कितीही संकटे आली तरी बिनधास्त सामना करू शकतो' हे पालुपद मिरवण्याच्या आहारी जातात. याउलट, समस्यांनी ग्रासलेले असण्यात काही गैर नाही, हे समजून कलाकारांनी बोलते व्हायला हवे. खरे तर सामान्य माणसांसाठीसुद्धा बोलते होणे ही अतिशय अवघड बाब असते. स्वाभाविकच, स्वतःच्या इमेजला जपणारे कलाकार तर मोकळे होण्यासाठी अधिक कचरतात. सामान्य जनतेसमोर असणाऱ्या इमेजला धक्का पोहोचेल असे मानून कलाकार मन मोकळे करत नाहीत. अनेक भावनिक, आर्थिक समस्या मनात दाबून ठेवल्यामुळे एके दिवशी त्यांचा डोंगर तयार होतो. साहजिकच समस्येशी दोन हात करण्याची ताकद कमी होते. अशा वेळी समस्यांविषयी बोलल्याने भार हलका होऊ शकतो, हे समजून घ्यायला हवे.

मध्यंतरी दीपिका पदुकोण हिने असा प्रयत्न केला होता. सोशल मीडियाच्या माध्यमातून आयुष्यातील समस्यांविषयी ती मोकळेपणाने बोलली होती. हे कृत्य तिला साहजिकच अवघड गेले, पण तिला चाहत्यांचा, आप्तेष्टांचा पाठिंबा मिळाला. तेव्हा तिने एक महत्त्वाची बाब निदर्शनाला आणून दिली. एखाद्या कलाकाराच्या दुर्दैवी मृत्यूनंतर 'त्याने मन मोकळे करायला पाहिजे होते' अशी वक्तव्य केली जातात. पण अशी विधाने करण्याऐवजी स्वतःहून सहकलाकारांची चौकशी करण्याच्या महत्त्वाबद्दल ती बोलली होती. एकदा-दोनदा विचारपूस केल्यावर फक्त कलाकारच काय, इतरही कोणी समस्यांविषयी चर्चा करत नाही. त्यामुळे सातत्याने विचारपूस करत राहा. एकदा विचारपूस केल्यावर जबाबदारी संपल्याच्या आविर्भावात राहू नका. 'आस्क अगेन अँड अगेन अँड अगेन' अशा आशयाचे आवाहन तिने केले होते. स्वतःसोबत सहकलाकारांच्याही मानसिक स्वास्थ्याची जबाबदारी घेता यायला हवी, हेदेखील तिच्या वक्तव्यामधून स्पष्ट होते. याचीच दुसरी बाजूही विचारात घेण्यासारखी आहे. कलाकारांभोवती असलेल्या वलयामुळे विश्वासार्ह मित्रपरिवार लाभायला बराच वेळ लागतो. अनेकदा एखाद्या कलाकाराला बोलायची इच्छा असली तरी आजूबाजूला विश्वासार्ह व्यक्ती नसतात. यावर तोडगा काढणे अवघड असले तरी अशक्य नाही. कलाकारांनी मानसशास्त्रज्ञांची मदत घेणे विचारात घ्यायला हवे. फक्त कलाकारांच्या मानसिक आरोग्यासाठी प्रयत्नशील संस्थांचा उदय व्हायला हवा. भावनिक आणि आर्थिक समस्यांमुळे वाढणारा तणाव आटोक्यात आणण्यासाठी एखादी संस्था कार्यरत असेल तर फायदेशीर ठरेल. मात्र अशा संस्थांना, कलाकारांची ओळख आणि समस्या जनतेसमोर येणार नाहीत, यासाठी खबरदारी घ्यावी लागेल. कलाकारांना असा मदतीचा हात मिळाला, तर आत्महत्येचे प्रमाण नक्कीच कमी होईल.

## शब्दकोडे-१४०



आडवे शब्द - ३. राख ४. किंचित देखील ७. यादवीत बुडालेली नगर १०. गीतेतील ज्ञान मराठीत आणणारे १२. वर्ण १४. रोटीचे एक धान्य १५. दह्याचे पाचक पेय १६. आयुष्यभर १९. दिवाळीतील 'लक्ष्मी' २१. दिसायला एकसारखे २३. स्पष्ट केलेले २६. वार्धक्य २८. आयुष्य २९. पाण्यातील सजीव ३१. वंश ३२. मीठ (हिंदी) ३५. शाश्वत, कायमचे ३६. सलगी ३७. लाकूड कापण्याचे साधन ३९. वादावादी ४०. आजोबा म्हणणारी ४१. पुष्कळ ४३. हेळसांड, दुर्लक्ष ४७. ठाऊक, ज्ञात ५०. मनोरंजन ५२. सामूहिक व्यायाम ५३. गुणांची कदर नसलेला ५५. मियांचा दंडावरचा दागिना ५६. संकट (ला.) ५७. दारू, मद्य ५८. न बोलण्याचे व्रत ६०. नाकारलेले ६२. पार्वती ६३. चार वेदांपैकी एक ६५. रवींद्रनाथांचे काव्य ६७. महिना ६८. कर्ज ६९. भेटवस्तू ७०. ठीक, बेताचा ७१. वर्षाव, सरबत्ती ७२. सरशी ७३. ताठा ७४. सुळका ७६. लाचार, उपकाराच्या ओझ्याला दबलेला ७७. भारतीय बाजारपेठेवर आक्रमण केलेला देश ७९. शत्रू ८०. चोप ८१. भंगूर ८२. उलट ८३. प्रशस्त, पाल्हाळिक

उभे शब्द - १. खोटा, लटका २. 'श्यामाची आई'चे लेखक ३. रामाचा एक भाऊ ५. बेडूक ६. क्रोध ८. तरुणी ९. चुलता १०. राग आणणारे ११. जरब, भीती १३. दरवाजा, दार १७. प्रसाद, यज्ञातील आहुती १८. आठवण (हिंदी) २०. अमृत २२. चिंचवड या नदीकाठी आहे २४. त्वचेवर लावण्याचे औषध २५. केस २७. बुधकौशिक रचित स्तोत्र २९. जयघोष ३०. रौप्य ३१. हुलगे ३३. मिठी ३४. खुमारी, स्वाद ३८. फरक ४०. अनुयायांसाठी आदर्श ४२. ताकद ४४. दम दाटी, दम ४५. सेपे ४६. तीव्र गरज ४७. असफल ४८. लकडा ४९. खुमखुमी ५१. पाठवणी ५४. थर्मामीटरमधील धातू ५६. अवस्था ५९. बुजणारा, संकोची ६०. असंतोष ६१. जंत ६२. कमी महत्त्वाचे ६३. सर्प ६४. जास्त किंमतीचे ६६. लाल ६८. सत्य ६९. उरलेले ७२. खोगीर ७४. अन्नाचा घास ७५. विष ७७. भेग ७८. हे तर दुधातच लपलेले असते ८०. महाशिवरात्रीचा महिना

## शब्दकोडे १३९ चे उत्तर

आडवे उत्तर- १.सुरवंट ४.कडेकपार ७.मधुमक्षिका १०.चवदार ११.लाल १२.वाद १३.पोरकट १५.वासा १७.नजरानजर २०.हेमा २१.वीर २३.वडा २४.धनी २५.तमा २६.मसलत २८.वांड २९.कोमल ३१.कांचनमृग ३३.रया ३४.कस ३६.हरीत ३७.गरजवंत ३९.ग ४०.सागर ४२.तनया ४३.गरीब ४५.चावी ४६.जबरदस्त ४८.जन्म ४९.तळमळणे ५१.साव ५३.समरभूमी ५५.कमळ ५६.सुकट बोंबिल ६०.रजा ६१.मामी ६२.जनरीत ६४.तमासगीर ६७.जनावर ६९.रस ७१.पात ७२.रजा ७३.वा ७५.काळ ७६.आंबहळद ७७.गाणे ७८.सनदशीर ८१.चारा ८३.सलगी ८४.गणेशस्तुती ८५.विपरीत

उभे उत्तर- २.वंचक ३.टवटवीत ४.करवा ५.कला ६.पालन ७.मदन ८.मखर ९.कानोकानी १२.वारा १३.पोहे १४.रमाधान १६.सावधान १८.जवस १९.जड २२.रमाकांत २४.धडक २६.मगर २७.तरतरीत २९.कोळसा ३०.लहरबहर ३२.मृगया ३५.सजविणे ३८.वंग ४१.गज ४२.तस्त ४४.बळकट ४५.चाळ ४७.दशमी ४८.जवळजवळ ५०.कसरत ५१.साम ५२.असुरी ५४.मजा मारणे ५५.कमीज ५७.कतरबेत ५८.बोंड ५९.लज्जत ६३.नर ६५.सजा ६६.रवानगी ६८.नाकारणे ७०.सह ७१.पादचारी ७४.रद ७७.गार ७८.सल ७९.शीग ८०.वास्तु ८२.रात

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले. **'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४. **नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# नाशिक मनपाच्या वृक्ष उत्सवाचे उत्साहात उदघाटन

**सायकल रॅली, वृक्ष दिंडी, पर्यावरणपूरक संदेश देत शहरातून निघाली मशाल रॅली**

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक महापालिकेच्या वतीने पर्यावरण विभाग व हिरवांकुर फाउंडेशनच्या माध्यमातून दादासाहेब गायकवाड सभागृह येथे दि. ४ ते ६ ऑगस्ट दरम्यान देशी प्रजातीच्या झाडांची रोपांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनाचे अर्थात वृक्षोत्सव प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उदघाटन पर्यावरण प्रेमी भारती गमे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व फीत कापून करण्यात आले.

विविध प्रकारच्या देशी प्रजातींचे वृक्ष या प्रदर्शनात मांडले असून आयुर्वेदात देशी प्रजाती झाडांचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती शालेय विद्यार्थी प्रदर्शनाला भेट देणाऱ्या नागरिकांना देत आहेत. याप्रसंगी हिरवांकुर फाउंडेशनच्या वतीने देशी-प्रजाती वृक्षांची, रोपांची माहिती असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन नाशिक मनपाचे पर्यावरण विभाग प्रमुख तथा उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, पर्यावरण प्रेमी भारती गमे, उद्यान अधिक्षक विवेक भदाणे, घनकचरा व्यवस्थापन संचालक डॉ. कल्पना कुटे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, हिरवांकुर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शाह निलयबाबु, शिक्षण अधिकारी बापूसाहेब पाटील, सायकलिस्ट फाउंडेशनचे योगेश वारे, प्रितेश महाजन, राखी शहा, प्रीती चौधरी, अनिल जगताप, पार्वती पटेल, योगेश पाटील, संतोष रेवडे पाटील, कैलास बोराडे, जगनाथ पावर, उल्हास कुलकर्णी, मनोज गायधनी, मनीषा रौंदल यांसह अनेक मान्यवरांनी केले. उदघाटन सोहळ्यादरम्यान शालेय विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. प्रास्ताविकात डॉ.विजयकुमार मुंडे यांनी सविस्तर माहिती विशद केली. प्रदर्शनाच्या उदघाटन सोहळ्यापूर्वी सकाळी ७ वाजता सायकल रॅली, मशाल रॅली व वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणपूरक मशाल रॅलीस पाथर्डी फाटा येथून प्रारंभ झाला. त्याचा शुभारंभ नाशिक ममपा अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या हस्ते झाला. नाशिक मनपा व नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्या वतीने राजीव गांधी भवन येथून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या सायकल रॅलीचा शुभारंभ उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे यांचे हस्ते झाला. यावेळी उद्यान अधीक्षक विवेक भदाणे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी पर्यावरण पूरक फलक दाखवून केला. सायकल रॅली, मशाल रॅली व वृक्षदिंडीचा समारोप दादासाहेब गायकवाड सभागृह येथे झाला. मशाल रॅली वृक्षदिंडी व सायकल रॅलीमध्ये सहभागी झालेल्या पर्यावरण प्रेमीं नाशिककरांनी प्रदर्शनाच्या उदघाटन सोहळ्यास उपस्थिती लावली.

## सूक्ष्म नियोजन, जिद्द, मेहनत यशाचे सूत्र : उन्हवणे



**सोपान महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार**

**नाशिक । प्रतिनिधी**

वेळेचे सूक्ष्म नियोजन, जिद्द आणि मेहनत हेच यशाचे सूत्र असून यातूनच ध्येय साकारता येते, असे प्रतिपादन पिपल्स रिपब्लीकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष शशीकांत उन्हवणे यांनी केले.

धम्मगिरी सामाजिक, शैक्षणिक संस्था संचलित सोपान योग महाविद्यालयात आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर ज्येष्ठ साहित्यिक तथा आंबेडकरी विचारवंत साराभाई वेळुंजकर, धम्मगिरी संस्थेचे मार्गदर्शक डॉ. विशाल जाधव, प्राचार्य यू. के. आहिरे, कवी रविकांत शार्दुल उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर सोपान महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार पार पडला. त्यामध्ये ड. भारत बुकाणे, वैशाली खैरनार, सतीश डोंगरे आदींचा समावेश होता. तसेच सोपान योग महाविद्यालयाच्या स्थापनेबद्दल सांगून योग प्रचार आणि प्रसारासाठी जास्तीत-जास्त विद्यार्थी व योगप्रेमींनी महाविद्यालयात सुरू असलेल्या पदवी आणि पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष कैलास जाधव, सचिव डॉ. पल्लवी जाधव, हर्षल पाटील आदींनी परिश्रम घेतले.

## माळी समाजाचा जिल्हास्तरीय गुणगौरव सोहळा रविवारी

**नाशिक ।** माळी समाज सेवा समितीच्या वतीने माळी समाजातील विद्यार्थ्यांचा जिल्हास्तरीय गुणगौरव समारंभ उद्या रविवारी दि.(६) रोजी सकाळी १०.३० वाजता कालिदास कला मंदिर शालीमार नाशिक येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार वसंत गिते, अप्पर महसूल आयुक्त निलेश सागर, अति आयुक्त मनपा नाशिक भाग्यश्री बानायत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाचे अध्यक्ष भानुदास माळी, नाशिक शहर भाजपचे अध्यक्ष प्रशांत जाधव, सुजाता इळवे, योगेश कमोद, प्रा.टी.पी निकम, बाळासाहेब जानमाळी, चंद्रकांत बागुल, डॉ.शाम पगार,प्रवीण गायकवाड, डॉ.दौलतराव गांगुर्डे, सचिन माळी, मनीष जाधव उपस्थित राहणार आहेत.

### साक्री तालुका अंगणवाडी कार्यकर्तीची सहकारी पतसंस्था मर्यादित, साक्री निविदा

दिनांक :- ४ ऑगस्ट २०२३

साक्री तालुका अंगणवाडी कार्यकर्तीची सहकारी पतपेढी मर्यादित साक्रीला वर एक मजला करावयाचा आहे. पुर्वीची दुमजली इमारतीवर हा मजला आहे. या नवीन मजल्यासाठी मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. इमारत बांधकामासंदर्भातील विस्तृत माहिती संस्थेचे कार्यालयात उपलब्ध आहे.

संस्थेचे कार्यालय :-प्लॉट नंबर -०६, जानकी नगर, पेरेजपुर रोड, मु.पो.ता. साक्री जि. धुळे.

निविदा भरणाऱ्याला ५ हजार रूपये अनामत रक्कम भरावी लागेल. सकाळी ११ ते ५ या वेळेत कार्यालयात विस्तृत माहिती पाहता येईल.

दिनांक:- १४ ऑगस्ट २०२३ पावेतो सिलबंद पाकिटात आपल्या निविदा पाठविणे.

(शिक्का)

**सौ. संगिता नरेंद्र तोरवणे**
चेअरपर्सन
साक्री तालुका अंगणवाडी कार्यकर्तीची
सहकारी पतपेढी मर्यादित साक्री

# सायकलिस्ट हृतीका गायकवाडची एशियन गेम्स एमटीबी सायकल स्पर्धेसाठी निवड; नाशिकच्या शिरपेचात मानता तुरा

**राधालक्ष्मी फाउंडेशन, एपीआय हेमंत नागरे यांच्यासह दात्यांचा हृतीकाला मदतीचा हात**

**सायकलसह इतर आवश्यक साहित्यासाठी सुमारे ६ लक्ष रुपयांची मदत**

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिकची सायकलपटू हृतीका गायकवाडची एशियन गेम्स एमटीबी सायकल स्पर्धेसाठी निवड झाली असून तिच्या निवडीमुळे नाशिकच्या शिरपेचात मानता तुरा खोवला गेला आहे. विशेष एशियन गेम्स मध्ये नाशिकच प्रतिनिधित्व करण्यासाठी जात असलेल्या हृतीका गायकवाडला राधालक्ष्मी फाउंडेशन, एपीआय हेमंत नागरे यांच्यासह नाशिककर दात्यांनी मदतीचा हात दिल्याने तिच्या स्वप्नांना अधिक बळ मिळालं आहे.

नाशिकची सायकलपटू हृतीका गायकवाडची घरची परिस्थिती ही अतिशय हलाखीची आहे. या परिस्थितीवर मात करून तिने एशियन गेम्स मध्ये आपले स्थान पक्क केलं आहे. तिला या स्पर्धेसाठी सायकलसह, हेल्मेट, बूट व इतर आवश्यक वस्तूंची खरेदी करण्यासाठी सुमारे सहा लाखांहून अधिक रकमेची गरज होती. यासाठी सर्वप्रथम नाशिकच्या क्राईम ब्रांच विभागातील सहायक पोलीस निरिक्षक हेमंत नागरे यांनी तिच्या सायकल खरेदीसाठी मदतीचा हात देऊ केला. त्यानंतर माजी नगरसेवक अॅड.तानाजी जायभावे यांच्या माध्यमातून राधालक्ष्मी फाउंडेशनच्या अॅड.अश्विनी देशपांडे यांच्या माध्यमातून तिच्या सायकलसह इतर आवश्यक वस्तूंसाठी मदत गोळा करण्यात आली. नुकताच हॉटेल सिबल येथे झालेल्या छोटेखानी सोहळ्यात तिला सायकलसह मदत सुपूर्त करण्यात आली.

एशियन गेम्स मध्ये नाशिकच प्रतिनिधित्व करण्यासाठी हृतिका गायकवाड जात असल्याने नाशिकमधील अनेक दात्यांनी तिला एकत्र येऊन मदतीचा हात दिला आहे. तसेच डॉ.शेफाली भुजबळ, मनोहर देशपांडे, तुकाराम नवले, उमेश वानखेडे, हेमंत देशपांडे, मोनालिसा जैन, मकरंद सावरकर, सागर मुंदडा, समीर रकटे यांच्यासह अनेक नाशिककर मान्यवरांचे तिला सहकार्य लाभले आहे. नाशिकच्या २२ वर्षीय हृतिका गायकवाड हिने आतापर्यंत राज्य आणि देशपातळीवर झालेल्या अनेक स्पर्धांमध्ये सुवर्ण आणि रौप्य पदक पटकवले आहेत. एशियन गेम्स मध्ये भारतातून केवळ दोन महिला खेळाडूंची निवड झाली असून त्यामध्ये हृतिका गायकवाड हिचा समावेश आहे. १० सप्टेंबर २०२३ रोजी ती या स्पर्धे साठी रवाना होणार आहे. तिच्या पंखाना अधिक बळ देण्यासाठी अजून नाशिककर दात्यांनी पुढे येऊन तिला मदतीचा हात देण्याची आवश्यकता आहे. हृतिका गायकवाडला नाशिककरांकडून मिळालेल्या मदतीबद्दल तिने आयोजित कार्यक्रमात सर्व दात्यांचे आभार मानले आहे. तसेच या स्पर्धेसाठी अधिक मेहनत घेऊन या स्पर्धेत देशासाठी पदक मिळवणार असल्याचे तिने यावेळी सांगितले. यावेळी तिचे प्रशिक्षक मनोज महाले यांच्यासह कुटुंबातील सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते.

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था व हितसंबंधित, तसेच मिळकतीचे खाजगी दलालांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी भोकर येथील गट क्रमांक १९५/२ब पैकी प्लॉट नं. ४ क्षेत्र १८२.२५ चौ.मी. हा बखळ प्लॉट यांसी चतु:सीमा मंजुर नकाशाप्रमाणे.

येणेप्रमाणे चतु:सीमांकित मिळकत ही विमल सिताराम अग्रवाल यांचे मालकी व कब्जे उपभोगातील मिळकत आहे.

वर नमूद मिळकतीवर वर नमूद केलेल्या कब्जेदार यांचे व्यतिरीक्त इतर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टांच, बोजा, खरेदी विक्री, करार, मदार, हस्तांतरण, हक्क व हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर इतर हितसंबंध, कोर्ट कचेरी, वहिवाट असल्यास ही टायटल व्हेरीफिकेशन नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. वरील कालावधीत कोणाचीही, कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे. असे समजुन आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील आणि त्यानंतर म्हणजे मुदतीनंतर कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे.

प्रस्तुतची जाहिर नोटीस ही आमचे पक्षकारांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून त्यांचेवतीने आमचे मार्फत प्रसिध्दीस देण्यात आली असे.

**विमल सिताराम अग्रवाल**

धुळे
दिनांक : ०४/०८/२०२३

**अॅड. राकेश पी. रनाळकर**
११४, अॅडव्होकेट्स चेंबर्स,
जिल्हा न्यायालय आवार, धुळे
मो.नं. ९३७२८११८२७

---

**अॅड. एम. सी. बेडसे**
**निशाणी नं.६**

### जाहीर नोटीस

**साक्री येथील मे. ज्युडी. मॅजि. सो. वर्ग- १ यांचे कोर्टात**

**फौ.कि.अर्ज नं४५४/२०२३**

श्री. पुनाजी बाबुलाल सोनवणे,
उ.प. ४२, धंदा- शेती,
रा. वासखेडी, ता. साक्री जि. धुळे ......अर्जदार
।। विरुध्द ।।
निबंधक जन्म-मृत्यु,
तथा
म. ग्रामसेवक, ग्रामपंचायत वासखेडी,
ता. साक्री जि. धुळे ....सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदाराच्या मुलाचा जन्म वासखेडी, ता. साक्री धुळे येथे दि. ०७/१२/२००८ रोजी झालेला असुन त्याचे नाव सावन पुनाजी सोनवणे असे आहे. या विषयी हा अर्ज अर्जदाराने सादर केलेला आहे या अर्जात पुढील सुनावणीची तारीख ११/०९/२०२३ रोजी नेमली आहे. तरी कुणास या अर्जाबाबत हरकत असेल तर सकाळी १०.३० वाजता हजर राहून आक्षेप नोंदवावा या करीता हि जाहीर नोटीस असे.

(शिक्का)

**क.लिपिक** — फौजदारी न्यायालय कोर्ट, साक्री
**अधिक्षक** — फौजदारी न्यायालय कोर्ट, साक्री

---

**निशाणी नं.६**

### जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं.९२०/२०२३**

१) लोटन महादु पाटील
उ. वय.:- ५५, वर्ष,कामधंदा, मजुरी
२) कल्पनाबाई लोटन पाटील
उ. वय.:- ५०, वर्ष,कामधंदा, मजुरी
३) छाया योगेश पाटील
उ. वय.:- २४, वर्ष, कामधंदा, मजुरी
४) लीना योगेश पाटील
उ. वय:- १, महिना, कामधंदा, मजुरी
अर्जदार क्र. ३ ही अर्जदार क्र. ४ ची अ.पा.क म्हणुन
अर्जदार क्र. १ ते ४ रा. नगाव ता. जि. धुळे ....अर्जदार
वि.
कै. योगेश लोटन पाटील (मयत)
मृत्यु दिनांक २१/०२/२०२३
मुत्यु ठिकाण नंगाव ता. जि. धुळे .....सामनेवाला

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. २५/०७/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ९२०/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै.योगेश लोटन (मयत) याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व अर्जदार याना सदर वारस दाखला हा शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे. म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ४ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०५/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. ८, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०१/०८/२०२२ आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकून** — मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.
**अधिक्षक** — मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.

---

**अॅड. निखिल रविंद्र भावसार**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.सह दिवाणी न्यायाधीश व स्तर सो. यांचे न्यायालयात.**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९२६/२०२३**

सुलोचना गवरलाल गोसावी .......अर्जदार
विरूध्द
कै. राहीबाई बाप शिवगीर उर्फ शिवाजी गोसावी ....मयत

ज्याअर्थी की, अर्जदार सुलोचना गवरलाल गोसावी उर्फ सुलोचना पुंडलिक गोसावी हि कै. राहीबाई बाप शिवगीर उर्फ शिवाजी गोसावी यांची मुलगी आहे. कै.राहीबाई बाप शिवगीर उर्फ शिवाजी गोसावी यांचे दि. ११/११/२०१४ रोजी मौजे धुळे येथे निधन झालेले आहे. कै.राहीबाई बाप शिवगीर उर्फ शिवाजी गोसावी यांच्या नावावर असलेल्या मौजे धुळे ता. जि. धुळे येथील स.नं. ५८१ चे क्षेत्र ला ला. १ हे ८३ आर पो.ख. ० हे.०४ आर असे एकुण क्षेत्र १ हे ८७ आर.ची मिळकत यावर इतर अधिकार सदरी अर्जदार हिचे नावे लावण्याकरीता वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदारने बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे.

आणि ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. ११-०९-२३रोजी मे. कोर्टात चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दिनांक -०३/०८/२०२३ (शिक्का) आदेशावरुन

**वरिष्ठ लिपीक** — दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे
**अधिक्षक** — दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे

---

**अॅड. एम. बी. जैन**
**निशाणी नं.६**

### जाहीर समन्स

**धुळे येथील मे. ३ रे सह दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**रे.मु. नं. ३७२/२०२१**

गणपतसिंग प्रतापसिंग गिरासे .......वादी
विरूध्द
ग्रामपंचायत वार वै. ....... प्रतिवादी

प्रति २७) दादाजी दिपा मोरे ३३ ) रामचंद्र देवचंद मालचे ३५) भगवान रावण मोरे ३६) रतीलाल भगवान मोरे सर्व रा. वार (कुंडाणे) ता. जि. धुळे

ज्याअर्थी वादीने दाखल केलेला उपरोक्त दावा वर नमुद न्यायालयात न्यायप्रविष्ठ असुन सदर दाव्यातील वरील नमुद प्रतिवादीना मे. कोर्टा मार्फेत तसेच रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आले असता आपणावर प्रभाविपणे बजावणी होत नसल्याचे दिसते.

त्याआर्थी वर नमुद दाव्याची पुढील सुनवणी तारीख ०८/०९/२०२३ असुन सदर तारखेस सकाळी १०:३० वाजता आपण स्वता: जातीने किंवा यथायोग्य सुचना दिलेल्या असुन जो दाव्या संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल किंवा अश्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकनारी व्यक्ती ज्याच्या बरोबर असेल अश्या माहितगार वकीला मार्फेत दाव्याचे कामी हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलविण्यात येत आहे आणि उक्त दिवशी तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा व तुमच्या कबज्यात किंवा अखत्यारीत असलेले दस्तऐवज हजर करण्याचा निर्देश तुम्हाला या द्वारे देण्यात येत आहे. वर नमुद दिवशी तुम्ही हजर न राहील्यास तुमच्या गैरहजेरीत वर नमुद दाव्याचे कामकाज व सुनवणी होवुन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर समन्स माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिले असे.

आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकून** — दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे
**अधिक्षक** — दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे

---

प्रोसेज जमा

**अॅड. आर. बी. जाधव**
**निशाणी नं.६**

### जाहीर नोटीस

**साक्री येथील मे. ज्युडी. मॅजि. सो. वर्ग- १ यांचे कोर्टात**

**फौ.कि.अर्ज नं४९४/२०२३**

श्री. आप्पा कृष्णा माळीच,
उ.व. ३२, धंदा- शेती,
रा. नाडसे, ता. साक्री जि. धुळे .......अर्जदार
।। विरुध्द ।।
निबंधक जन्म-मृत्यु,
तथा
म. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत म्हसदी प्र. नेर,
ता. साक्री जि. धुळे ...........सामनेवाला
कु. ममता आप्पा माळीच
(जन्म तारीख - ०१/०३/२०१७)

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे.न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग यांच्या न्यायालयात दि. ०३/०८/२०२३ रोजी फौ. कि.अ.नं. ४९४/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्या अर्थी वरील अर्जदार याने जन्म-मृत्युनोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) महाराष्ट्रजन्म - मृत्यु नोंदणी नियम २००० मधील कलम ९ (३) प्रमाणे जन्माची नोंद करणेबाबत साक्री न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता दि.२०/०९/२०२३ ही निश्चीत केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, याबाबत काही वाद, हरकत असल्यास येथील मे. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग 'सो. यांच्या न्यायालयात उक्तनिश्चित तारखे पर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थितन झाल्यास सदरकामी कोणाची काही एक हरकत नाही. असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे सही शिक्यानिशी प्रसिध्दीस दिले असे.

दिनांक :- ०३/०८/२०२३
स्थळ:- साक्री

(शिक्का)

**क.लिपिक** — फौजदारी न्यायालय कोर्ट, साक्री
**अधिक्षक** — फौजदारी न्यायालय कोर्ट, साक्री

## न्यूज कॉलम

### किरकोळ वादातून चाकूने हल्ला

**धुळे ।** किरकोळ कारणावरून वाद घालत तरुणावर चाकूने हल्ला केल्याची घटना देवपुरातील लाला सरदार नगर भागात मंगळवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास घडली. यात अख्तर शेख अजीजशेख अजीज आणि त्याचा साथीदार जखमी झाला. देवपूर पोलिसात गुन्हा दाखल झाला.

### लासलगाव ते थेटाळे मार्गे वनसगाव बस सुरू

**लासलगाव ।** गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असलेल्या लासलगाव ते थेटाळे मार्गे वनसगाव बस सेवा रेल्वे गेट नंबर १०३ चे काम पूर्ण झाल्यानंतरही लासलगाव बस आगारातर्फे आठ महिने बंद होती.थेटाळे ते वनसगाव बस सेवा पूर्ववत सुरू व्हावी यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून डी के जगताप व सुवर्णा जगताप यांनी सतत पाठपुरावा केला.अखेर ही बस सुरू झाल्याने जगताप यांच्या पाठपुरव्याला यश आले आहे. परंतु आता बस सेवा पुन्हा सुरु होत असल्यामुळे विद्यार्थी व गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला व जगताप दांपत्याचे आभार मानले. यावेळी भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा सुवर्णा जगताप,लासलगाव मंडल उपाध्यक्षा रूपा केदारे,थेटाळे गावच्या सरपंच शितल शिंदे,सदस्य सोनाली शिंदे,ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर शिंदे,रयत शिक्षण संस्थेचे चव्हाण,केदारे,ज्ञानेश्वर कुशारे,सुनील शिंदे,यांच्यासह थेटाळे येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

# बोरकुंड येथील बोरी नदीवरील तीन साखळी बंधाऱ्यांचे जलपूजन

**धुळे । प्रतिनिधी**



बोरकुंड येथे बोरी नदीवर बांधण्यात आलेल्या तीन साखळी बंधाऱ्यांचे जलपूजन करण्यात आले. बोरकुंडचे प्रथम लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब भदाणे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या, ४०० लक्ष रुपये निधीतून हे तीन साखळी बंधारे करण्यात आले. या तीन साखळी बंधार्यांचे जलपूजन स्त्री शक्तीच्या हस्ते करण्यात आले, साडी चोळीचा आहेर अर्पण करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने महिला पदाधिकारी व महिला ग्रामस्थ उपस्थित होत्या. बोरी नदी बारमाही करणार्या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या दिशेने हे पुढचे पाऊल असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

बोरी नदी बारमाही करण्यासाठी बोरकुंडचे प्रथम लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब भदाणे व जि.प.सदस्या शालिनी भदाणे या प्रयत्नशिल आहेत. यासाठी त्यांच्याजवळ महत्वाकांक्षी क्शन प्लॉन आहे. ठिकठिकाणी होणाऱ्या साठवण बंधाऱ्यांमुळे बोरी नदीचे बारमाहीचे स्वप्न साकारतांना दिसत आहे. मांडळ पासुन ते बोरकुंड-रतनपुरा- दोंदवाड गावादरम्यान, बोरी नदीवर लाखों रुपयाचे फेजर गेट-साखळी बंधारे झाल्याने बोरी बारमाही होण्याच्या दिशेने यशस्वी वाटचाल सुरु झाली आहे. रतनपुरा- बोरकुंड आदी पाणीपुरवठा योजनेतील उद्भव विहीरींच्या पाण्याची पातळी वाढुन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न यामुळे कायमस्वरुपी निकाली निघणार आहे. तसेच परिसरातील शेतकऱ्यांचा सिंचनाचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. या बोरी नदीवरील साखळी बंधार्यात वसंत राघो पाटील यांच्या शेतावर १२५ लक्ष किमतीचा साखळी बंधारा, रतनपुरा पाणीपुरवठा विहिरीजवळ १५० रुपयाचा बंधारा व याच नदीवर अशोक दिनकर भदाणे यांच्या शेताजवळ १२५ लक्ष किमतीचा बंधारा असे तीन बंधारे साखळी पद्धतीने बांधले गेले आहेत. यासाठी जिल्हा नियोजन आराखड्यातून निधी उपलब्ध करून जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ही कामे पूर्ण करण्यात आलीत. ही साखळी बंधार्यांची कामे करतांना निधीची बचत करण्यात आली. या बचतीतून बोरकुंड पाणीपुरवठा विहिरी जवळही एक छोटा भूमिगत बंधारा बांधण्यात आला.

बोरकुंड ग्रामपंचायतीवर महिला राज असल्याने तसेच बोरकुंड व रतनपुरा या दोन्ही गटात जिल्हा परिषद सदस्य या महिला असल्याने हे जलपूजन नारी शक्तीच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानच्या सचिव व जिल्हा परिषद सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे, जिल्हा परिषद सदस्या अनिता प्रभाकर पाटील, बोरकुंड लोकनियुक्त सरपंच सुनीता हेमंत भदाणे उपसरपंच सविता संजय माळी, माजी सरपंच मंगलाबाई माळी, माजी पं.स.सदस्य कमलबाई माळी, ग्राम पंचायत सदस्य आशाबाई भदाणे, रूपाली भदाणे, बेबाबाई देवरे सविता पाटील, मंगलाबाई माळी, रेखाबाई भदाने माधुरी सुभाष अहिरे, ममता भदाणे, सौ पारीख ,प्रमिलाबाई भदाणे, मंगलाबाई भदाणे, कमलबाई भदाणे, अलकाबाई भदाणे व बहुसंख्य महिला उपस्थित होत्या. इंदूबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे यांच्या प्रयत्नामुळे, ४०० लक्ष निधीतून हे तीन साखळी बंधारे पूर्ण झाल्याने सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तर सुटणार आहेच. परंतू बोरी-बारमाहीचे स्वप्न पूर्ण होण्याच्या दिशेने एक यशस्वी पाऊलही टाकले गेल्याने परिसरातून समाधान व्यक्त केले जात आहे.

# शिरपूरात संभाजी भिडेंच्या प्रतिमेस जोडेमारो आंदोलन



**होळनांथे । प्रतिनिधी**

महापुरूषांबद्दल वादग्रस्त विधान केल्याने शिरपूर शहरातील सावता परिषद, समता परिषद, अखिल भारतीय माळी महासंघ, सावता प्रतिष्ठान, माळी महासंघाच्या वतीने माथेफिरू मनोहर कुलकर्णी तथा संभाजी भिडें विरोधात शिरपूर तहसील कार्यालयासमोर संभाजी भिडे यांच्या प्रतिमेस जोडे मारून निदर्शने करण्यात आली.

यावेळी तालुक्यातील राजकिय, सामाजिक नेत्यांसह शहरातील संघटनांकडून संताप व्यक्त केला जात आहे. सुरुवातीला आंदोलकांनी नायब तहसीलदार अधिकार पेंढारकर यांना निवेदन देत भिडेंवर कारवाई करून तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. मनोहर कुलकर्णी हे भारतीय राष्ट्रध्वज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले, महात्मा गांधी यांच्या विरोधात अपमानास्पद भाष्य वापरुन जातीय सलोख्यात तेढ निर्माण करीत आहेत. यापूर्वी त्यांनी असे वक्तव्य केले असल्याचे निवेदनात म्हटले आहे. स्त्री शिक्षणाची द्वारे उघडणाऱ्या थोर समासुधारक महात्मा फुले यांच्या बद्दल अशी वक्तव्ये करणाऱ्या मनोहर भिडें विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून समाजात तेढ निर्माण करून दंगलीचे बीज पेरणाऱ्या भिडेला तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी वरील संघटनांच्या वतीने करण्यात येत आहे.

निवेदनावर सावता परिषदेचे विभागीय अध्यक्ष युवराज माळी, जिल्हाध्यक्ष दिलीप माळी, अखिल भारतीय माळी महासंघाचे विभागीय अध्यक्ष वासुदेव देवरे, ओबीसीचे विभागीय अध्यक्ष शामकांत ईशी, तालुकाध्यक्ष संतोष खैरनार, पं.स.सदस्य यतिश सोनवणे, अधिकार माळी, जिल्हा युवाध्यक्ष संदिप देवरे, माजी नगरसेवक दिपक माळी,तालुकाध्यक्ष हेमंत माळी, जिल्हा उपाध्यक्ष संतोष माळी, जिल्हा उपाध्यक्ष गौरव सोनवणे, योगेश माळी, वसंत माळी, बिपीन रोकडे, समता प्रतिष्ठानचे भटू पाटोळे, राकेश माळी, सुरेश माळी, दिलीप पाटील, नितिन रोकडे व इतर संघटनांचे पदाधिकारी उपस्थीत होते.

## जयश्रीबेन अमररिशभाई पटेल सीबीएसई स्कूल मध्ये कारगिल विजय दिवस साजरा



**शिरपूर ।** शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित वाघाडी येथील जयश्रीबेन अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूल मध्ये २६ जुलै रोजी कारगिल दिवस साजरा करण्यात आला.

भारत देशाच्या रक्षणासाठी कारगिलच्या युद्धात प्राणांची बाजी लावून लढणाऱ्या शूरवीर सैनिकांच्या स्मृतींना उजाळा देण्याच्या उदात्त भावनेने शाळेत कारगिल दिवससाजरा करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे माजी सैनिक मनोज मंगळे उपस्थित होते. कारगिल युद्धात शहीद झालेल्या अमर जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर मनोज मंगळे यांनी विचार व्यक्त केले. प्राचार्या मेघा मुंगसे यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी कारगिल विजय दिवसपर भाषणे दिली. कारगिल युद्धात शहीद झालेल्या वीर सैनिकांची यशोगाथा सादर केली. चौथीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले, पाचवीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर आधारित जोशपूर्ण नृत्य सादर करुन शाळेतील वातावरण देशभक्तीने भारावून टाकले. सूत्रसंचालन शिक्षिका शितल बाबर यांनी केले. आभार सचिन सिसोदिया यांनी मानले. कार्यक्रमासाठी सोनाली मामीडवार, अपर्णा मोकाशी, सिमरन कौर, दिपाली पाटील, सुचिता जैन, अदिती बारी, प्रदीप सर, कलाशिक्षक प्रशांत पाटील, विशाल माळी व कर्मचाऱ्यांनी संयोजन केले.

# कुसुंबा व पिंपळनेर येथे कलाभूषण कैलास तानकर मोटिवेशनल शो चे आयोजन

**सामोडे । प्रतिनिधी**

सगरवंशिय जिरे माळी समाजाचे हरहुन्नरी नागपुरचे बहुकलागुणी सेवानिवृत्त डी . वाय.एस.पी. कलाभूषण कैलास तानकर हे आयुष्याच्या संसार पटलावरील वयाच्या ६२ व्या वर्षात देखिल महाराष्ट्र महाराष्ट्रा बाहेर परदेशात देखिल प्रसिद्धीच्या शिखरावर पोहचलेले रंगकर्मी गायक कलावंत आहेत. त्यांनी त्यांच्या आयुष्यात खाकी वर्दीत राहूनही देश सेवा , समाज सेवा , राष्ट्रहिता बरोबरच समाजाच्या सेवेत देखिल त्यांचा सहभाग नोंदवलेला आहे.

उंचपुरे , सुदृढ बांधा , सतेज कांती , फिल्मी दुनियेतली हिप्पी स्टाईल केशरचना मुखात कधी दर्दभरी , कधी क्लासिकल , तर कधी भावगीतांची सुरेल धुन गुणगुणणारे हसतमुख व्यक्तिमत्व म्हणंजे कैलास तानकर ! त्यांनी त्यांच्या आयुष्यात पोलिस सेवेसोबत कायद्याच्या चौकटीत राहून आपल्यातला कलावंत जागा ठेवून फार मोठी क्रांती घडऊन आनली आहे . त्यांनी त्यांच्या निवडक गुणात्मक कलोपासक १२० कलावंताना एकत्र घेऊन म्युझीकल मोटिवेशनल नावाचा शाळा ,कॉलेज , विद्यालये , महाविद्यालये इथे जाऊन लोकरंजनातून लोक शिक्षण व मनोरंजनातून समाज प्रबोधन करण्याचे काम उभ्या महाराष्ट्रातच नव्हे तर देशाबाहेर देखिल ते त्यांच्या सहकार्यासह मोफत कार्यक्रम करत आहेत.हे विशेष आहे आणि त्याचाच एक भाग उत्तर महाराष्ट्रात खांदेशात पहिलाच आपल्या कलागुणांचा व्यक्तिमत्व विकासाचा बहुरंगी बहुढंगी हास्य विनोद प्रबोधन हिंदी मराठी गीते म्युझीकल डान्स आणि बरेच काही धुळे जिल्ह्यातील चौगाव रोड कुसुंबा येथिल केशव स्मृती आदिवासी आश्रम शाळा येथे ९ ऑगस्ट क्रांतीदिन व आदिवासी दिनानिमित्त प्रथमच मोटिवेशन शो ५ ऑगस्ट २०२३ व दि६ ऑगस्ट २०२३ रोजी दाजी साठे इंग्लिश मेडियम स्कुल पिंपळनेर (सामोडे) येथे शो संपन्न होणार असल्याची माहिती पगारे परिवार व महात्मा फुले विद्या प्रसारक संस्था पिंपळनेरचे संस्थापक अध्यक्ष संभाजीराव पगारे यांनी दिली. पाच हजार गाणी तोंडपाठ असून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने दोन वेळा नोंद घेतली आहे . त्यांच्या विद्यार्थी प्रबोधन विनामुल्य सेवेची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन त्यांना राज्याच्या सांस्कृतिक विभागाच्या मोटिवेशनल शोच्या प्रमुखपदी निवडीचे पत्र नुकतेच बहाल केले आहे . अशा ह्या माळी समाजाचे भूषण कलारसिक मायबाप प्रेक्षकांचे हृदयस्थान महाराष्ट्राच्या रंगदेवतेचे पुजारी कैलास तानकर यांच्या रंजन मनोरंजन व्यक्तिमत्व विकास कार्यक्रमाचा मोफत लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या सचिव सौ . पुष्पलता संभाजीराव पगारे यांनी केले आहे .

## चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास फाशी द्या



### सकल मराठा समाजाचे शिंदखेडा तहसीलदारांना निवेदन

**शिंदखेडा । प्रतिनिधी**

अवघ्या नऊ वर्षाची चिमुकली कु.कल्याणी वर अत्याचार करत तोंड दाबून दगडाने डोके ठेचून नराधमाने हत्या केली होती. माणुसकीला काळीमा फासणारी घटनेबाबत शिंदखेडा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने तहसीलदार शिंदखेडा यांना निवेदन देण्यात आले. स्वप्निल पाटील या नराधमाने खून केल्याची कबुली दिली आहे. नराधमाला कठोरात कठोर शिक्षा व्हावी आणि ही शिक्षा देशातील जनतेसमोर देण्यात यावी जेणेकरून पुढे या प्रकारचे कृत्य कोणी करणार नाही.या आशयाचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. या घटनेचा सकल मराठा समाजाच्या वतीने निषेध करण्यात आला. व तहसील कार्यालयात नराधमाच्या विरोधात महिला व पुरुषां द्वारे घोषणा देण्यात आल्या.

## पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे गठन!

# निमंत्रकपदी अनिल चव्हाण तर समन्वयकपदी अंबादास बेनुस्कर

**धुळे । प्रतिनिधी**





पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे धुळे जिल्हा निमंत्रक म्हणून पत्रकार अनिल भिका चव्हाण यांची तर समन्वयकपदी साक्री येथील पत्रकार अंबादास टिकाराम बेनुस्कर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य निमंत्रक एस.एम.देशमुख यांनी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात वरील नियुक्त्यांची घोषणा केली.

राज्यातील पत्रकार हल्ला विरोधी कृती समित्यांची पुनर्रचना करण्यासाठी सर्व जिल्हास्तरीय समित्या बरखास्त करण्यात आल्या असून आता नव्याने जिल्हा आणि तालुका स्तरावर समित्यांचे गठण करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर धुळे जिल्ह्यातील पदाधिकार्यांच्या घोषणा मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आली. नवीन नेमणुका पुढील दोन वर्षांसाठी असतील. हे पदाधिकारी मराठी पत्रकार परिषदेला पूरक असे काम करतील तसेच वरिष्ठांशी चर्चा करून तालुकानिहाय पत्रकार हल्ला विरोधी कृती समित्यांचे पदाधिकारी नियुक्त करतील, असे सुचित करण्यात आले आहे. पत्रकारांवर होणारे हल्ले, त्यांच्यावर दाखल केले जात असलेले खोटे खटले, पत्रकारांना देण्यात येणार्या धमक्यांबाबत आवाज उठविण्याचे काम पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती करते. सर्व जिल्ह्यातील नियुक्त्या पूर्ण झाल्यानंतर पत्रकार संरक्षण कायद्याची माहिती सर्वांना व्हावी यासाठी लवकरच एक मेळावा घेण्यात येणार आहे. यावेळी सर्व जिल्हा निमंत्रक आणि समन्वयकांना सन्मानित केले जाईल, असेही एस.एम.देशमुख यांनी स्पष्ट केले आहे. धुळे जिल्हा निमंत्रक अनिल चव्हाण व समन्वयक अंबादास बेनुस्कर यांच्या नियुक्तीचे स्वागत होत आहे आहे.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

**होळ । प्रतिनिधी**

शिंदखेडा तालुक्यातील कृषी माध्यमिक विद्यालय होळ या विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याधापक डि.पी.सिसोदे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.डि.पी.सिसोदे यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांचे प्रतिमेचे दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवन व कार्याविषयी अतिशय सुंदर माहिती कथन केली. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यालयाचे मुख्याध्यापक डी पी सिसोदे यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती सांगितली. ते म्हणाले, लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे



यांचे विचार व कार्य फक्त वाचन व लेखन एवढ्यापुरतेच मर्यादित न ठेवता ते आचरणात आणले पाहिजेत. लोकमान्य टिळकांकडून देशभक्ती, देशप्रेम, निर्भीडपणा, स्पष्टवक्तेपणा तर अण्णाभाऊ साठे यांच्याकडून साहित्य लेखनाचा गुणधर्म घेतला पाहिजे. शाळा व महाविद्यालयात टिळक पुण्यतिथी निमित्त '' टिळकांचे बालपण व शिक्षण'' आणि '''' टिळकांचे स्वातंत्र्य लढ्यातील कार्य'' या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा झाली. या लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धेत लहान गटात ७५ आणि मोठ्या गटात ४५ असे एकूण १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यालयातील सौ .सी.ए .पाटील मॅडम आणि श्री वाय. जी.सोनवणे सर यांनी केले.

**वक्तृत्व स्पर्धेत विजयी विद्यार्थी**

**लहान गट**

१) नयन चेतन पाटील
२) जागृती समाधान पाटील
३) भूमिका मुकेश पाटील

**मोठा गट**

१) हिमांशू गजानन पाटील
२) वैष्णवी एकनाथ पाटील
३) हरीश जगदीश पाटील
४) खुशी भटू पाटील

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735, प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक लक्ष महाराष्ट्र





# धुळ्यात जनआक्रोश मोर्चा; आरोपींना फाशी देण्याची मागणी















धुळे।

मणिपूर राज्यासह देशभरातील दलित, आदिवासी समाजावर अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. मात्र, कठोर कायदा तयार करण्यासाठी सरकारकडून कोणतीही पावले उचलली जात नसल्याने आदिवासी समाजात संतापाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर धुळ्यात सलग दुसर्या दिवशी भिल आदिवासी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारोंच्या संख्येने भिल आदिवासी समाजबांधव सहभागी झाले होते. मोर्चा दरम्यान सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत संताप व्यक्त करण्यात आला. शहरातील फाशीपुल येथून दुपारी १ वाजेच्या सुमारास जन आक्रोश मोर्चाला सुरवात झाली. येथून हा मोर्चा महात्मा फुले स्मारक, बारापत्थर, राजवाडे संशोधन मंडळ मार्गे, गुरुशिष्यस्मारकाकडून क्युमाईन क्लब येथे धडकला. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहर पोलीस ठाणे व आझादनगर पोलीस ठाण्यातील कर्मचारी लक्ष ठेवून होते. या विराट मोर्चामुळे वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. हा मोर्चा क्युमाईन क्लबजवळ धडकल्यानंतर मोर्चाच्या धुरीनांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यानंतर शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाप्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मणिपूर राज्यात कुकी आदिवासी समाजातील महिलांची नग्न धिंड काढून बलात्कार तसेच खून करणार्या आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, मणिपूरचे अकार्यक्षम मुख्यमंत्री विरेंद्र सिंग यांचे सरकार बरखास्त करुन राष्ट्रपती राजवट लागू करावी, तसेच राज्यातील संपूर्ण सुरक्षा भारतीय सेनेकडे सोपवून मणिपूर राज्यातील दंगलीवर नियंत्रण मिळवावे, देशात समान नागरीकायदा (युसीसी) लागू करु नये, देशातील अल्पसंख्यांक दलित, आदिवासी महिलांवर होणारे अत्याचार थांबवावेत, धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा महामार्गावर धमाणे येथे दि.९ जुलै २०२३ रोजी आदिवासी तरुण रमेश सोनवणे याचा खून झाला होता, या खुनाची सीबीआय चौकशी करावी, मध्यप्रदेश येथे आदिवासी युवकावर मुत्रविसर्जन करणारा बीजेपी कार्यकर्ता प्रवेश शुक्ला याच्यावर कठोर कारवाई करावी, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र





# आदिवासी जनआक्रोशमोर्चाने धुळे दणाणले













धुळे । मणिपुर राज्यात आदिवासी महिलांची नग्न धिंड काढून त्यांच्यावर अत्याचार करणार्या आरोपींना फाशी द्यावी. धमाणे (ता. धुळे) येथे भिल्ल समाजाच्या तरूणावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याची सीबीआयमार्फत चौकशी करावी, शिरपूरात मातंग समाजाच्या बालिकेवर बलात्कार करणार्या आरोपीला जन्मठेपेची शिक्षा द्यावी, यासह विविध मागण्यासाठी शहरातून भिल्ल आदिवासी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. मोर्चात हजारोंच्या संख्येने आदिवासी महिला, पुरूष व तरूण हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. या मोर्चांने शहर दणाणून गेले होते. मोर्चा क्युमाईन क्लबजवळ धडकल्यानंतर शिष्टमंडळाने राष्ट्रपतींच्या नावे असलेले निवेदन जिल्हाधिकार्यांना दिले. शहरातील फाशी पुल चौकापासून या आक्रोश मोर्चाला सुरूवात झाली. मोर्चा सरळ महात्माफुले पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, गुरूशिष्य स्मारक, नवीन महापालिकेमार्गे क्युमाईन क्लबजवळ पोहोचला. मोर्चात मोर्चेकर्यांनी हातात विविध घोषणा व मागण्यांचे फलक, भगवान एकलव्य यांची प्रतिमा असलेले लाल व पिवळे झेंडे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेले निळे झेंडे तसेच काहींनी तिरंगा ध्वज होती घेतला होता. यावेळी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणा बाजी करण्यात आली.

संकलन : दिपक वाघ